मुख्य कार्यालय, विरार
विरार (पुर्व),
ता.वसई, जि.पालघर, पिन- ४०१ ३०५.

दुरध्वनी :०२५०-२५२५१०५/०६/२५२९८८८/२५२९८९०
फॅक्स: ०२५०-२५२५१०७.
ई- मेल :vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र :व.वि.श.म /वृक्षप्राधि/ ९६७/२३/२४

दिनांक : ४/५/२०२३

वसई-विरार शहर महानगरपालिका
वृक्षप्राधिकरण विभाग
जाहिर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ कलम ८ (३) क मधील तरतुदीनुसार, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, खालील नमूद वृक्ष कापणे बाबतचा अर्ज वृक्षप्राधिकरण विभागात प्राप्त झालेला असून सदर प्रकरणी सूचना प्रसिदधी पासून ०७ दिवसांकरीता हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत. संबंधित अर्ज व इतर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | अर्जदाराचे नाव व पत्ता | प्राप्त अर्ज व दिनांक | झाडाचा प्रकार व नग | मा.वृक्षअधिकारी यांचेकडे सादर करणेत आलेला मसुदा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | डायरेक्टर डॉ.ॲनथोनी डिसुजा प्रेमांजली कॉन्सीलींग सर्विस ट्रस्ट श्री.बॉम्बे झेवेरियम कॉपोरेशन करीता डायरेक्टर फादर वेन्स डिमेलो ऊर्फ वेन्स फ्रान्सीस दमेल, रा- गास, नालासोपारा | २२/०२/२०२३ | नारळ - ०१ | वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "ई"** कार्यक्षेत्रामधील **गाव मौजे गास, नालासोपारा (प.)** येथिल नमुद अर्जदार यांच्या संस्थेच्या मालकी जागेत कंम्पाऊंड लगत असलेले **नारळ प्रजातीचे ०१ झाड** जिर्ण झालेले असून झाडाच्या बुंध्याला किड लागल्यामुळे सदर झाडाचा बुंधा कमकुवत झालेला आहे. त्यामुळे **स्तंभ क्र.४** मध्ये नमुद असलेले धोकादायक झाड कापणे आवश्यक आहे. |
| २ | भालचंद्र पार्क को.ऑ.हौ.सो.लि. प्लॅाट नं.१३२ व १३३, सर्वे नं.११४ आणि १२० (पार्ट), चक्रधर नगर, नालासोपारा (प.) | ०१/०३/२०२३ | नारळ ०२ | वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "ई"** कार्यक्षेत्रामधील नमुद सोसायटीच्या आवारात **नारळ प्रजातीची ०२ झाडे** असून **नारळाचे ०१** झाड बाजूला असलेल्या राज पॅलेस सोसायटीच्या बाजूने झुकलेले असून पार्किंग केलेल्या वाहनांवर व नागरीकांच्या अंगावर पडून धोका होऊ शकतो. व **नारळाचे दुसरे झाड** बुडाला कुजलेले असून पूर्णपणे पोकळ झालेले असल्याने धोकादायक झाडे कापणे आवश्यक आहे. |
| ३ | श्री.अजय हरिश्चंद्र वाळिंजकर, रा- महात्मा फुले नगर, समेळ, नालासोपारा (प.) | १७/०२/२०२३ | नारळ ०१ | वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "ई"** कार्यक्षेत्रामधील नमुद अर्जदार यांच्या मालकी जागेत **नारळ प्रजातीचे धोकादायक** झाड असून सदर झाडाला वाळवी लागलेली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | असल्याने कमकुवत झालेली आहेत त्यामुळे धोकादायक झाड कापणे आवश्यक आहे. |
| ४ | प्र.सहा.आयुक्त,<br>प्रभाग समिती जी,<br>वालीव विभाग,<br>व.वि.श.म | २७/०३/२०२३ | भेंड - ०१ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "जी"** कार्यक्षेत्रामधील **वॉर्ड क्र.७५ मध्ये** तुंगारेश्वर येथे तुंगारेश्वर मोबाईल शॉप ते कमळाकर यांचे घर व साईश्रद्धा चाळ ते तुंगारेश्वर प्लॉट पर्यंत रस्त्याचे खडीकरण डांबरीकरणामध्ये **०१ नग भेंड प्रजातीचे झाड** बाधित होत आहेत. |
| | | २७/०३/२०२३ | नारळ - २७<br>जांभुळ - ०२<br><br>**एकूण - २९** | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "जी"** कार्यक्षेत्रामधील **वॉर्ड क्र.७६ मधील** रेजन्सी हॉटेल ते साईपुजा जनरल स्टोर पर्यंतचा डी.पी.रस्ता खडीकरण डांबरीकरणामध्ये **नारळ - २७, जांभुळ - ०२ अशी एकूण २९** झाडे बाधित होत आहेत. |
| | | २७/०३/२०२३ | **प्रत्यारोपण**<br>वहावा - ०७<br>आंबा - ०४<br>वदाम - ०८<br>कदंब - ०३<br>कडुनिंब - ०१<br>जांभुळ - ०१<br>पिंपळ - ०२<br>फायकस -०१<br>सिताफळ -०१<br>नारळ -०१<br>अशोक - ०२<br>**एकुण - ३१ झाडे (प्रत्यारोपण)** | **कापणे**<br>वहावा - ०२<br>वदाम - ०४<br>कडुनिंब - ०१<br>जांभुळ - ०१<br>सप्तपर्णी - ०३<br>विलायती चिंच -०१<br>गुलमोहर - ०७<br>रेनट्री - ०१<br>उंबर - ०१<br>ख्रिसमस ट्री - ०१<br><br>**एकुण - २२ झाडे (कापणे)**<br><br>**शेरा**<br>वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "जी"** कार्यक्षेत्रामधील **वॉर्ड क्र.७६ मधील** गोलानी नाका ते एम.एस.सी.बी. ऑफिस मागे मुख्य नाल्यापर्यंत(डावी बाजू) आर. सी. सी. गटार बांधकामामध्ये भुखंडावर अस्तित्वात असलेल्या ५३ **झाडांपैकी ३१ झाडे प्रत्यारोपण करणे** व **२२ झाडे कापणे** आवश्यक आहे. |
| | | २७/०३/२०२३ | बोर - ०३<br>गुलमोहर - ०२<br>वदाम - ०१<br>**एकुण - ०६ झाडे** | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "जी"** कार्यक्षेत्रामधील वॉर्ड क्र.११५ मधील कामण बापाणे ३० मीटर डी.पी. रस्ता खडीकरण व डांबरीकरणामध्ये **बोर - ०३, गुलमोहर - ०२ वदाम - ०१ अशी एकूण ०६ झाडे** बाधित होत असून **प्रत्यारोपण** करून वाचविता येतील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | उप अभियंता,<br>प्रभाग समिती ए,<br>बोळिंज विभाग,<br>व.वि.श.म | ०८/०३/२०२३ | रेनट्री - ०१ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रभाग समिती "ए" कार्यक्षेत्रामधील प्रभाग क्र.२१ मधील बुदधविहार कल्वर्ट ते स.नं. १५० या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे हे काम बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात आलेले आहे. सदर बांधकामात रेनट्रीचे ०१ झाड बाधित होत असल्याने कापणे आवश्यक आहे. |
| ६ | अध्यक्ष /सचिव,<br>श्री.वसंत केशव कुमार,<br>युनिक पार्क<br>को.ऑ.हौ.सो.आगाशी रोड, विरार (प.) | १०/१०/२०२२<br>व<br>२६/१२/२०२३ | पिंपळ - ०१ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "ए"** कार्यक्षेत्रामधील नमुद अर्जदार सोसायटीच्या आवारात **पिंपळ प्रजातीचे ०१ झाड** असून सदरचे झाड संरक्षक भितीवर नैर्सागिकरित्या वाढलेले असून सिक्युरिटी केबीन, पाण्याची टाकी व संरक्षक भिंतीला तडे गेल्याने धोकादायक झाड कापणे आवश्यक आहे. |
| ७ | सुरसंगम<br>को.ऑप.हौ.सो.लि.हाथी मोहल्ला, वसई (प.) | १५/०२/२०२३ | नारळ - ०४ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रामधील नमुद सोसायटीच्या आवारात नारळ प्रजातीची ०४** झाडे असून इमारतीच्या बाजूने झुकलेली आहेत. तसेच नारळाची बुंधे वाळवीने पोखरलेली असून धोकादायक असल्याने **स्तंभ क्र.४** मध्ये नमुद झाडे कापणे आवश्यक आहे. |
| ८ | मोहक को.ऑप.हौ.सो.<br>मनवेलपाडा रोड,<br>विरार पूर्व. | २०/१२/२०२२ | नारळ - ०१ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "बी" कार्यक्षेत्रामधील** नमुद सोसायटीच्या आवारात **०१ नग नारळ** प्रजातीचे झाड असून सदर झाडाला वाळवी लागलेली असून बाजूला असलेल्या इमारतीवर पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे धोकादायक असलेले झाड कापणे आवश्यक आहे. |
| ९ | सहा.आयुक्त,<br>प्रभाग समिती डी,<br>आचोळे विभाग,<br>व.वि.श.म | १७/०३/२०२३ | जंगली - १०<br>पाम - ०१<br>रेनट्री - ०३<br>**एकूण - १४** | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "डी"** कार्यक्षेत्रामधील मुख्य रस्त्यालगत असलेली **स्तंभ क्र.४ मध्ये नमुद** असलेली झाडे संपूर्ण सुकलेली असून पावसाळयात वादळी वाऱ्याने झाडाच्या जीर्ण झालेल्या फांद्या / झाड |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | नागरीकांच्या अंगावर/वाहनांवर पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे धोकादायक असलेली झाडे कापणे आवश्यक आहे. |
| १० | पुनम एव्हरस्टेट को.ऑ.हौ.सो.लि. रा-फनफिस्टा सर्वे नं.५६, श्रीप्रस्था, नालासोपारा (प.) | ०३/०५/२०२३ | पाम - १५ | वसई-विरार शहर महानगरपालिका **प्रभाग समिती "ई"** कार्यक्षेत्रामधील नमुद सोसायटीच्या आवारात कंपाऊंडलगत **पाम प्रजातीची १५ झाडे** असून झाडाच्या बाजूने ड्रेनेज लाईन, सेफ्टी टँक व वॉटर टँक आहे. सदर झाडांची मुळे ड्रेनेज लाईनमध्ये शिरली असून ड्रेनेज लाईन पूर्णपणे चोकप झालेली आहे. सदर झाडांमुळे पाण्याची टाकी लिकेज होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे धोकादायक असलेली झाडे कापणे आवश्यक आहे. |

वसई-विरार शहर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण उद्यान विभाग

(नयना ससाणे)
उपआयुक्त तथा वृक्षअधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका